पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 22/02/2020 (शनिवार)
(सायंकाळ)

---

## विदर्भातील विविध जिल्हयातील घरफोडी करणारा अट्टल चोर गजाआड
## (स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण पोलीस पथकाची कार्यवाही)

स्था.गु.शा. :– स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीणचे पोलीस पथक दि. 21/02/2020 रोजी पो.स्टे. उमरेड येथील घरफोडी चे गुन्हयांतील आरोपीचे शोध घेणे कामी समांतर तपास करीत असतांना मिळालेल्या गोपनिय माहीतीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक जिल्हा बालाघाट राज्य मध्यप्रदेश येथे रवाना होवुन बालाघाट पासुन 10 कि.मी. अंतरावरील राजेगाव या गावात रात्रीचे वेळी सुरू असणा–या सांस्कृतीक कार्यक्रमात रात्रीचे वेळी 2 ते 3 तास थांबुन आरोपी नामे प्रवीण अशोक डेकाटे रा मोहाडी जि.भंडारा यास शोधुन त्यास ताब्यात घेवुन त्यास विश्वासात घेवुन सखोल विचारपुस केली असता त्याने नागपुर जिल्हयातील पो.स्टे. उमरेड येथील अप.क्र. 31/20 कलम 457,380 भादवि व अप.क्र. 84/20 कलम 380 भादवि असे घरफोडीचे 2 गुन्हे, चंद्रपुर जिल्हयातील पो.स्टे. ब्रम्हपुरी येथील अप. क्र. 29/20 कलम 457,380 भादवि व पो.स्टे. नागभीड येथील अप.क्र. 01/20 कलम 454,457,380 भादवि असे घरफोडीचे 2 गुन्हे तसेच भंडारा जिल्हयातील पो.स्टे. भंडारा शहर येथील अप.क्र. 68/20 कलम 457,380 भादवि चा घरफोडीचा 1 गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

मौजा उमरेड परिसरातील कावरापेठ येथील श्री. मंगेश यशवंत जुनघरे यांचे घरी दि. 19/01/2020 चे रात्री दरम्यान नगदी 4,60,000/–रू व सोन्याचे दागीने किं. 2,00,000/–रू असा एकुण 6,60,000/–रू चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याचे तक्रार पो स्टे उमरेड येथे दिलेली होती. घटने मध्ये मोठया प्रमाणात मुद्देमाल चोरीला गेलेला असल्याने घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन घटनेचे दिवसा पासुनच स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामिण चे पथक सदर घटनेचा आरोपीचा छडा लावण्याचे दृष्टीकोणातुन समांतर तपास करीत होते. त्याचप्रमाणे दिनांक 02/02/2020 रोजी कावरापेठ येथेच पुन्हा याच पध्दतीने दुसरी घरफोडी होवुन सदर घरफोडीत नगदी 35,000/–रू ची रक्कम चोरीला गेलेली होती. वारंवार होणा–या अशा प्रकारचे घटनांमुळे परिसरात चोरी बाबत भितीचे वातावरण निर्माण झालेले होते. दोन्ही घटना सारख्याच पध्दतीने झालेल्या असल्यामुळे दोन्ही घटनेमधील आरोपी हा एकच असावा त्या दृष्टीने तपास करण्यात आला. आरोपी हा चोरी करतांना एकटाच चोरी करीत असे तसेच चोरी करावयाचे घराचे आजुबाजुला सुरू असलेल्या घरांचे बांधकामा वरील साहीत्य ( सब्बल, सळाखी ) मिळवुन त्या साहीत्यांचे मदतीने घराचे कुलुप तोडुन घराचे आत प्रवेश करून घरफोडीचे गुन्हे करीत असे. तसेच चोरी केल्या नंतर मिळालेल्या पैशांतुन गोवा, दिल्ली, मुंबई अशा ठिकाणचे पर्यटन स्थळी जावुन ऐशो आरामाचे जिवन जगत असल्याचे तपासात समोर आले आहे. मिळुन आलेल्या आरोपीस पुढील कायदेशीर कार्यवाही कामी पो.स्टे. उमरेड यांचे ताब्यात देण्यात आलेले असुन आरोपी कडुन चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्याची कार्यवाही सुरू आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे आदेशाने सहा.पोलीस निरीक्षक जितेंद्र वैरागडे, पोलीस हवालदार संतोष पंधरे, पोलीस शिपाई राधेश्याम कांबळे, पोलीस शिपाई बालाजी साखरे, सायबर सेलचे पोलीस शिपाई0 सतिष राठोड आणि चालक पोलीस हवालदार भाऊराव खंडाते यांचे पथकाने केली.



अटक आरोपीसह स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीणचे पोलीस पथक

## जबरी संभोग

पो.स्टे. खापरखेडा :– दिनांक 12/04/2019 चे 11:00 वा. चे सुमारास फिर्यादींची 16 वर्षीय पिडीत मुलगी हिच्या सोबत मागील 1 वर्षापासुन आरोपी नामे– फाटा उर्फ रूपेश संतोष उईके, वय 19 वर्ष, रा. आबादी वार्ड क्र. 4, खापरखेडा याच्या सोबत प्रेमसंबंध होते. आरोपीने पीडितेसोबत वेळोवेळी घरा मागील शेतात शारीरिक संबंध प्रस्थापीत केले. त्यामुळे पीडिता ही गर्भवती राहुन बाळाला जन्म दिला. पीडितेची प्रकृती बिघडल्याने बाळा सह उपचाराकामी मेडीकल हॉस्पीटल नागपूर येथे भरती केले असता बाळाचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 376(2)(एफ)(एन) भादंवि. सहकलम 5(जे)(2)(एल), 6 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलिस निरीक्षक नंदा पाटील 8419953444 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर